


महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील अंक...
साप्ताहिक RNI : MAH/MAR/2011/40762 पोस्टल नंबर : MCW/354/2021-23

# धगधगती मुंबई

website:www.dhagdhagtimumbai.in E-mail : dhagdhagtimumbai@gmail.com

वर्ष : १६ अंक : २८, संपादक - भिमराव हिंदुराव धुळप मंगळवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑगस्ट २०२६ पाने : ४ मूल्य : २ रुपये

## भुलेश्वरच्या राजाची मूर्ती कोसळण्याची दुर्घटना; गणेशोत्सव मंडळांनी सुरक्षेला प्राधान्य द्यावे

मुंबई : गणेशोत्सवाच्या तयारीला वेग आलेला असतानाच शनिवारी सायंकाळी मुंबईतील भुलेश्वर परिसरात घडलेल्या दुर्घटनेने सर्वांनाच हादरवून सोडले. भुलेश्वरच्या राजाची तब्बल २७ फूट उंच मूर्ती आगमनादरम्यान क्रेनवरून अचानक खाली कोसळली. या दुर्घटनेत भुलेश्वर राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष संकेत नेवशे आणि पदाधिकारी ब्रिजेश जोशी यांचा मृत्यू झाला, तर दोन लहान मुलींसह पाच जण जखमी झाले.

या दुर्घटनेनंतर मूर्ती कोसळण्यामागील नेमके कारण काय, याची चौकशी सुरू आहे. दरम्यान, प्राथमिक



माहितीनुसार मूर्तिकाराने मूर्तीच्या सुरक्षित वाहतुकीबाबत काही सूचना केल्या होत्या. मात्र, मंडळाच्या कार्यकर्त्यांनी त्या सूचनांकडे दुर्लक्ष करून मूर्ती नेण्याचा आग्रह धरल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे मूर्तिकाराच्या सूचनांचे पालन केले असते तर ही दुर्घटना टळली असती का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

रविवारी शोकाकुल वातावरणात संकेत नेवशे आणि ब्रिजेश जोशी यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रातील गणेशोत्सव मंडळांनी विशेष खबरदारी घेणे गरजेचे आहे. विशेषतः उंच व भव्य गणेशमूर्ती मंडळाच्या ठिकाणी नेताना क्रेनची क्षमता, मूर्तीची बांधणी, वजनाचा समतोल, वाहतुकीचा मार्ग, विद्युत तारा तसेच रस्त्यावरील अडथळे यांची योग्य तपासणी करावी. मूर्तिकार, तांत्रिक तज्ज्ञ आणि संबंधित प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

गणेशोत्सव हा आनंद, श्रद्धा आणि उत्साहाचा सण आहे; मात्र त्यासोबत सुरक्षिततेची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे मुंबईसह राज्यातील सर्व गणेशोत्सव मंडळांनी उंच मूर्तींचे आगमन करताना कोणताही धोका पत्करू नये आणि सर्व आवश्यक सुरक्षाव्यवस्था करूनच मूर्ती मंडपात न्यावी, असे आवाहन 'धगधगती मुंबई' परिवारातर्फे करण्यात येत आहे.

## रुग्णांच्या नातेवाईकांसाठी दर्जेदार सुविधा देण्याचा मुख्यमंत्र्यांचा पुढाकार

मुंबई : राज्यातील मोठ्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचा पुढाकार घेतला आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना मदत करणाऱ्या धर्मादाय संस्था आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष यांच्यात सामंजस्य करार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

मोठ्या रुग्णालयांमध्ये दररोज हजारो रुग्ण उपचारासाठी येतात. उपचाराचा खर्च, राहण्याची व भोजनाची व्यवस्था तसेच योग्य मार्गदर्शनाचा अभाव यामुळे त्यांच्या नातेवाईकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांना एकत्र आणून सुसूत्र आणि पारदर्शक व्यवस्था उभारण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे धर्मादाय रुग्णालये आणि स्वयंसेवी संस्थांकडून मिळणारी मदत गरजू रुग्णांच्या नातेवाईकांपर्यंत थेट व वेळेत पोहोचवता येणार आहे. रुग्णालयांच्या परिसरात निवारा, अल्पदरात किंवा मोफत भोजन तसेच वैद्यकीय मार्गदर्शनाची सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून दिली जाणार आहे.

धर्मादाय संस्था आणि शासकीय यंत्रणेच्या समन्वयातून राज्यात आदर्श आरोग्य सहाय्य मॉडेल उभारण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या उपक्रमात संस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

## युवाशक्तीच्या साथीने नशामुक्त नवी मुंबईचा संकल्प

नवी मुंबई : अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यापासून तरुणाईला दूर ठेवण्यासाठी नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या 'नशामुक्त नवी मुंबई' अभियानांतर्गत 'कॅम्पस कनेक्ट' उपक्रमाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, क्रीडा, कौशल्यविकास आणि राष्ट्रउभारणीकडे वळावे, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

अमली पदार्थांच्या वाढत्या आकर्षणामुळे तरुणांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. महाविद्यालयीन परिसर हा युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा




महत्त्वाचा टप्पा असल्याने, विद्यार्थ्यांमध्ये योग्य माहिती आणि जागरूकता निर्माण करणे हे 'कॅम्पस कनेक्ट'चे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

भारताची ६५ टक्के युवाशक्ती ही देशाची मोठी ताकद आहे. या शक्तीला व्यसनांच्या आहारी जाण्यापासून रोखण्यासाठी अमली पदार्थांची पुरवठा साखळी उद्ध्वस्त करण्यासोबतच मागणी कमी करण्यावरही भर देणे आवश्यक आहे, असे फडणवीस म्हणाले. प्रत्येक विद्यार्थी हा नशाविरोधी मोहिमेचा सैनिक असून 'नो टू ड्रग्स'चा संदेश प्रत्येक कॅम्पसमध्ये पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते व्यसनमुक्ती पुनर्वसन केंद्र व जनजागृतीपर चित्रफितीचे लोकार्पण करण्यात आले. पोस्टर्स व रील्स स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

मंत्री गणेश नाईक, भरत गोगावले, आमदार विक्रांत पाटील, रविंद्र फाटक, मंदा म्हात्रे, महेश बालदी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.




## परवान्याशिवाय महाप्रसाद वाटल्यास आयोजकांवर गुन्हा; एफडीएचा इशारा



मुंबई : श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर शहर व परिसरातील विविध मंदिरे, सार्वजनिक मंडळे तसेच भाविकांकडून ठिकठिकाणी महाप्रसाद व मोफत अन्नदानाचे आयोजन केले जाते. मात्र, अस्वच्छतेमुळे अन्नातून विषबाधा होण्याच्या घटना घडू नयेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) आता कडक भूमिका घेतली आहे.

भाविकांच्या आरोग्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने महाप्रसाद व अन्नदानाचे आयोजन करणाऱ्यांसाठी एफडीएचा परवाना घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. परवान्याशिवाय महाप्रसादाचे वाटप केल्यास आयोजकांवर गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. विशेष म्हणजे, महाप्रसादासाठी अवघ्या १०० रुपयांत ऑनलाइन परवाना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

अन्नसुरक्षेसाठी या चार नियमांचे पालन अनिवार्य

१. स्वच्छ पाण्याचा वापर : स्वयंपाक तसेच पिण्यासाठी केवळ स्वच्छ किंवा आरओ पाण्याचाच वापर करावा.

२. स्वयंसेवकांची स्वच्छता : अन्न तयार करणाऱ्या आणि वाढणाऱ्या स्वयंसेवकांनी मास्क, हँडग्लोव्हज आणि हेड कॅप वापरणे अनिवार्य आहे.

३. अन्न उघड्यावर ठेवू नये : तयार केलेला प्रसाद जास्त वेळ उघड्यावर ठेवू नये. शिळे अथवा खराब झालेले अन्न वाटप केल्याचे आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल.

४. सुरक्षित भांड्यांचा वापर : अन्न साठवण्यासाठी आणि वाटपासाठी केवळ स्टेनलेस स्टील किंवा इतर सुरक्षित भांड्यांचाच वापर करावा.

महाप्रसादाच्या माध्यमातून मोठ्या संख्येने भाविक अन्न ग्रहण करत असल्याने आयोजकांनी अन्नसुरक्षा व स्वच्छतेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन एफडीएकडून करण्यात आले आहे.

### सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी

मुंबई : अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) महाराष्ट्रात सुट्या किंवा खुल्या खाद्यतेलाच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी घातली आहे. एफडीए आयुक्त तुकाराम मुंडे यांनी यासंदर्भात १४ कलमी नियमावली जाहीर केली आहे. त्यानुसार खाद्यतेलाची विक्री केवळ सीलबंद व पूर्ण लेबल असलेल्या पॅकिंगमधूनच करावी लागणार आहे. उत्पादन दिनांक, एक्सपायरी, स्रोत व घटकांची माहिती लेबलवर असणे बंधनकारक आहे. जुने, गंजलेले टीनचे डबे किंवा वापरलेले प्लास्टिक पॅकिंग पुन्हा वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. हॉटेल व दुकानदारांना वारंवार तापवलेल्या तेलाचा पुनर्वापरही करता येणार नाही. नियमांचे उल्लंघन केल्यास दंडासह कारावासाची कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

## संपादकीय

# फडणवीस दिल्लीत जाणार ? चर्चांना पूर्णविराम की नव्या राजकीय समीकरणांची नांदी....

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची केंद्रीय मंत्रिमंडळात वर्णी लागणार आणि ते पुन्हा दिल्लीच्या राजकारणात सक्रिय होणार, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात रंगली होती. फडणवीस यांच्या दिल्ली दौऱ्यांमध्ये झालेली वाढ, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या भेटी आणि केंद्रातील संभाव्य मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चेमुळे या शक्यतेला आणखी बळ मिळाले. मात्र, स्वतः फडणवीस यांनी या चर्चांना पूर्णविराम देत आपण महाराष्ट्रातच असून राज्याच्या जनतेची सेवा करत राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर फडणवीस यांना तातडीने दिल्लीत बोलावण्यात आल्याची चर्चा झाली. त्यामुळे प्रधान यांच्या जागी फडणवीस यांची केंद्रीय शिक्षणमंत्री म्हणून नियुक्ती होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनीही अशाच शक्यता व्यक्त केल्या होत्या. अभ्यासू, उच्चशिक्षित आणि संघाच्या मुशीतून घडलेले फडणवीस राष्ट्रीय राजकारणासाठी योग्य चेहरा असल्याचे मानणारा एक वर्ग भाजपमध्ये आहे.

फडणवीस दिल्लीला गेले तर महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण, हा प्रश्नही त्याचवेळी चर्चेत आला. एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रीपद सोपविले जाईल की भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना संधी मिळेल, यावर तर्क-वितर्क सुरू झाले. मात्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, दिल्ली दौऱ्याचा उद्देश महाराष्ट्रातील प्रशासन, महत्त्वाचे विकास प्रकल्प आणि केंद्राकडून अपेक्षित असलेल्या मदतीबाबत पंतप्रधानांशी चर्चा करणे हा होता. महामार्ग, रेल्वे, मेट्रो आणि नदीजोड प्रकल्पांना गती देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचेही त्यांनी सांगितले.

मग फडणवीस यांना दिल्लीला पाठविण्याची चर्चा एवढी का रंगली? हा खरा प्रश्न आहे. भाजपच्या अंतर्गत राजकारणात फडणवीस हे केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नेते नाहीत. संघाशी असलेले त्यांचे जवळचे संबंध, प्रशासनाचा अनुभव आणि राष्ट्रीय पातळीवरची स्वीकारार्हता यामुळे भविष्यातील नेतृत्वाच्या चर्चेत त्यांचे नाव येणे स्वाभाविक आहे.

याच पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भविष्यातील भाजप नेतृत्वाबाबतही विविध राजकीय अंदाज बांधले जात आहेत. नरेंद्र मोदी यांच्यानंतर कोण, याबाबत शहा यांचे नाव आघाडीवर घेतले जाते. त्याचवेळी नितीन गडकरी, शिवराजसिंह चौहान, योगी आदित्यनाथ आणि देवेंद्र फडणवीस यांच्याही नावांची राजकीय वर्तुळात चर्चा होत असते. मात्र या चर्चांना अधिकृत आधार नसताना त्यावर निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल.

दरम्यान, केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. काही नव्या चेहऱ्यांना संधी मिळू शकते, तर काही विद्यमान मंत्र्यांच्या खात्यांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. मात्र सध्याच्या परिस्थितीत फडणवीस यांना महाराष्ट्रातच ठेवण्याला भाजप नेतृत्वाचे प्राधान्य असण्याची शक्यता अधिक वाटते. महायुती सरकारचा समन्वय, आगामी राजकीय आव्हाने आणि राज्यातील भाजप संघटना मजबूत करण्याची जबाबदारी लक्षात घेता फडणवीस यांची महाराष्ट्रातील उपस्थिती पक्षासाठी महत्त्वाची आहे.

त्यामुळे सध्या तरी 'फडणवीस दिल्लीला जाणार' या चर्चेपेक्षा 'फडणवीस महाराष्ट्रातच राहून दिल्लीशी समन्वय साधणार' हे वास्तव अधिक ठोस दिसते. मात्र दिल्लीतील सत्ताकारणात पडद्यामागे कोणती राजकीय समीकरणे आकार घेत आहेत, याचे उत्तर आगामी मंत्रिमंडळ फेरबदलानंतरच स्पष्ट होईल. राजकारणात अफवा कधी संकेत असतात, तर कधी दिशाभूल करणारे डावपेच. त्यामुळे फडणवीस यांच्या दिल्लीवारीकडे केवळ दौरा म्हणून पाहायचे की भविष्यातील राजकीय हालचालींची नांदी म्हणून, हे काळच ठरवेल.

# नवी मुंबईत गणेशोत्सव-नवरात्रोत्सवाच्या नियोजनासाठी मंगळवारी समन्वय बैठक

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गणेशोत्सव व नवरात्रोत्सव शांततेत, सुरक्षित आणि सुव्यवस्थित वातावरणात पार पडावा, यासाठी मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता नमुंमपा मुख्यालयातील तिसऱ्या मजल्यावरील ज्ञानकेंद्रात समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

महापौर सुजाता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीस उपमहापौर दशरथ भगत आणि आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी मंडप व स्टेज परवानगीची सुलभ प्रक्रिया, महापालिकेच्या विविध उपाययोजना, वाहतूक नियोजन, कायदा व सुव्यवस्था तसेच इतर अनुषंगिक विषयांवर चर्चा होणार आहे.

बैठकीस महापालिकेसह पोलीस, वाहतूक पोलीस, सिडको, एमएसईडीसीएल, आरटीओ आणि एमपीसीबीचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या प्रत्येकी एका पदाधिकाऱ्यास किंवा प्रतिनिधीसही बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यावर्षी गणेशोत्सव १४ ते २५ सप्टेंबर, तर नवरात्रोत्सव ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान होणार आहे.

# कराड शहरात मोबाईल शॉपीवर मध्यरात्री धाडसी दरोडा; 60 लाखांचे तब्बल 300 मोबाईल लंपास; चोरटे सीसीटीव्हीत कैद




कराड : कराड शहरातील मोहिते हॉस्पिटल शेजारी मध्यवर्ती भागात असलेल्या एस. एस. मोबाईल शॉपीवर अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री धाडसी दरोडा टाकल्याची घटना घडली. चोरट्यांनी दुकान फोडून सुमारे ६० लाख रुपये किमतीचे तब्बल ३०० मोबाईल फोन लंपास केल्याने शहरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्री चारचाकी वाहनातून आलेल्या चोरट्यांनी दुकानाचे शटर व सुरक्षा व्यवस्था तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर दुकानातील मोठ्या संख्येने मोबाईल फोन घेऊन चोरट्यांनी वाहनातून घटनास्थळावरून पलायन केले.

घटनेची माहिती मिळताच डीवायएसपी राजश्री पाटील आणि कराड शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. पोलिसांनी दुकान व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून, त्यामध्ये चोरटे कैद झाल्याचे समोर आले आहे.

चोरट्यांनी वापरलेल्या स्विफ्ट कारसह त्यांच्या संभाव्य मार्गांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून शहरातील तसेच शहराबाहेरील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे. चोरट्यांचा माग काढण्यासाठी पोलिसांची विविध पथके रवाना करण्यात आली असून, तांत्रिक माहितीच्या आधारे तपास सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कराड शहर पोलीस करीत आहेत.

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा पर्यावरण रक्षणाचा संदेश




मुंबई(रमेश औताडे) : पर्यावरणाचे रक्षण ही सामाजिक जबाबदारी असून देशाच्या भविष्यासाठीची अत्यावश्यक गरज आहे. यासाठी नानजीभाई खिमजीभाई ठक्कर महाविद्यालय, विश्व गुरुकुल विधी महाविद्यालय आणि बांदोडकर महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक तसेच नागरिकांनी पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.

पर्यावरण वाचवा, भारत देश वाचवा महाअभियान अंतर्गत ठाण्यात युवा अभिनंदन पर्यावरण प्रभात फेरीचे दिमाखदार आयोजन करण्यात आले होते. उत्साहपूर्ण वातावरणात निघालेल्या या प्रभात फेरीत विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि शाश्वत विकासाची जाणीव करून देणारे फलक हातात घेतले होते.

यावेळी सरश्री अशोक एन. जे. यांनी युवकांचे कौतुक करताना सांगितले की, आजच्या युवकांनी पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारली, तरच येणाऱ्या पिढ्यांसाठी अधिक सुरक्षित आणि सक्षम भारत घडविता येईल. प्रभात फेरीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या हातातील आकर्षक आणि आशयपूर्ण फलक हे या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

# करीष्मा प्रॉडक्टस बँगलोर कंपनीची हरि पानडी आणि बिरा मसाला अगरबत्ती बाजारात

मुंबई : अगरबत्तीच्या क्षेत्रात धूम मचवणारी करीष्मा प्रॉडक्टस बँगलोर येथील कंपनीने आता सणांचे विशेष महत्व लक्षात घेवून प्युअर ब्रँडची हरि पानडी आणि बिरा मसाला अगरबत्ती बाजारात आणली आहे. या अगरबत्तीच्या मनमोहक सुगंधाने देवाची प्रार्थना करताना मन एकदम प्रसन्न राहते. अगरबत्ती बनविण्यासाठी वापरण्यात आलेला उत्तम प्रकारचा परफ्युम व उत्तम दर्जाची काडी यामुळे ही अगरबत्ती बराच वेळ जळत राहते आणि विझल्यानंतर देखील तिचा सुगंध बराच वेळ दरवळत राहतो. या अगरबत्तीला नैसर्गिक सुगंध आहे. दैनंदिन जीवनात पवित्र कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या अगरबत्ती नैसर्गिक वनस्पती पासून तयार केल्या आहेत. वनस्पतीच्या गुणांच्या लाभाबरोबरच आरोग्य आणि मानसिक शांतीदेखील प्राप्त करू शकाल. ही अगरबत्ती ५० ग्रॅम, १०० ग्रॅम आणि २५० ग्रॅमच्या पॅकिंगमध्ये उपलब्ध आहे. अगरबत्ती खरेदी करताना करिष्मा प्रॉडक्टस बैंगलोर कंपनीचा लोगो बघूनच खरेदी करा व नकली अगरबत्ती पासून सावध रहा. कारण ही अगरबत्ती बनविण्यात आलेला परफ्युम हा आरोग्यास हानिकारक नाही म्हणून करिष्मा प्रॉडक्टस बँगलोर कंपनीची अगरबत्ती वापरा. करीष्मा प्रॉडक्टस बँगलोर कंपनीच्या अगरबत्त्या विविध प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत. तसेच, वास्तुयंत्र आणि प्युअर मसाला बत्ती प्रिमीअर क्वालिटी, साईथ आणि व्हाईट सेज प्रिमिअम मसाला बत्ती, ऊद वूड आणि बखूर नॅचरल बेस बत्ती, स्विट हनी आणि कॉन्फिडन्स मसाला बेस बत्ती, काश्मिरी लवेंडर आणि अंगारे ऊद नॅचरल बेस बत्ती, अंगारे ऊद आणि हिमालय नॅचरल बेस बत्ती, कस्तुरी आणि गोल्डन पेटल्स मसाला बत्ती अशा अनेक प्रकारच्या चांगल्या सुगंधी मसाला अगरबत्त्या प्रत्येक अगरबत्तीच्या दुकानात मुंबई व महाराष्ट्रात उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी करिष्मा प्रॉडक्टस, २४३, २ क्रॉस, कमलानगर, बँगलोर भ्रमणध्वनी क्र. ९३४३८३४८०५ वर संपर्क करणे.

# संघर्षातून यशस्वी उद्योजकतेचा प्रवास :

## डॉ. गोरखनाथ पोळ (वाढदिवसानिमित्त लेख)

काही माणसांच्या आयुष्याची कहाणी ही केवळ यशाची नसते, तर ती संघर्ष, जिद्द, मेहनत, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचारांची प्रेरणादायी गाथा असते. अशाच संघर्षातून स्वतःचे विश्व निर्माण करणारे, मनाने राजा असलेले आमचे मार्गदर्शक, सहकारी आणि जिवलग मित्र आदरणीय डॉ. गोरखनाथ पोळ यांचा दि. २७ ऑगस्ट रोजी ५१ व्या वर्षात पदार्पण होत आहे.



अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवनाची सुरुवात करताना त्यांनी वडापावचा पाव विकून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. त्याचबरोबर शिक्षणाची कास सोडली नाही. मिळेल ते काम करत, परिस्थितीशी दोन हात करत आणि प्रत्येक संधीचे सोने करत त्यांनी आपल्या आयुष्याला दिशा दिली. संघर्षाच्या काळातही शिक्षण आणि मेहनतीवरील विश्वास त्यांनी कधीही कमी होऊ दिला नाही.

पुढे 'जीवनदीप प्रकाशन' या नामांकित प्रकाशन संस्थेत कार्यरत होत त्यांनी विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आज ते एका महत्त्वाच्या जबाबदारीच्या भूमिकेत कार्यरत आहेत. संघर्षातून मिळालेल्या अनुभवांनी त्यांना केवळ यशस्वी व्यक्तीच नव्हे, तर इतरांना मार्गदर्शन करणारे व्यक्तिमत्त्व बनवले आहे.

'रुमालापासुन या संकल्पनेला प्रत्यक्ष व्यवसायाचे रूप देत त्यांनी 'S नॅपकिन बुफे' ची स्थापना केली. शुभकार्यांच्या स्वागतापासून ते पाहुण्यांच्या आनंदात भर घालण्यापर्यंत विविध उपक्रमांतून त्यांनी आपल्या व्यवसायाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज त्यांच्या कन्या मानसी या व्यवसायाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत आहेत.

डॉ. गोरखनाथ पोळ हे केवळ यशस्वी उद्योजक नाहीत, तर मैत्रीच्या दुनियेतील राजा माणूस, वनव्यामध्ये गारव्यासारखे आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारे अफलातून व्यक्तिमत्त्व आहेत.

त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासातून अनेकांना प्रेरणा मिळते. अशा या आदरणीय व्यक्तिमत्त्वास सुयश सामाजिक व शैक्षणिक शिक्षण संस्था तसेच 'धगधगती मुंबई' वृत्तपत्र परिवारातर्फे वाढदिवसाच्या लक्ष लक्ष हार्दिक शुभेच्छा!

ईश्वर त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख-समृद्धी आणि यशाची नवी शिखरे गाठण्याचे बळ देवो, हीच मनःपूर्वक सदिच्छा!




# महाराष्ट्र बाजारपेठेतर्फे भव्य रक्षाबंधन सोहळा उत्साहात संपन्न




**मुंबई :** भाऊ-बहिणीच्या प्रेम, जिव्हाळा आणि विश्वासाचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधनानिमित्त महाराष्ट्र बाजारपेठेतर्फे 'मान बहिणींचा... सोहळा रक्षाबंधनाचा!' या संकल्पनेवर आधारित भव्य रक्षाबंधन सोहळा रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी भायखळा येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात उत्साहात पार पडला. महिला सभासदांनी मोठ्या संख्येने सहभागी होत कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महाराष्ट्र बाजारपेठेच्या सीईओ सौ. अनुजा दांडगे आणि संस्थापक अध्यक्ष डॉ. कौतिक दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सोहळ्याचा उद्देश महिलांना एकत्र आणणे, त्यांच्या कलागुणांना वाव देणे आणि त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणे हा होता.

कार्यक्रमाला अभिनेत्री रेशम टिपणीस, रसिका वेंगुर्लेकर, अदिती द्रविड, मानसी कुलकर्णी, अभिनेता आनंदा कारेकर आणि दिग्दर्शिका समृद्धी पोरे यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी ग्रुप डान्स, पारंपरिक वेशभूषा रॅम्प वॉक, 'एक मिनिट' गेम शो आणि लकी ड्रॉ अशा विविध उपक्रमांनी कार्यक्रमात रंगत आणली. स्पर्धांचे परीक्षण निकिता घोरपडे, स्मिता भोसले, संपदा सुतार आणि अर्चना अडारकर यांनी केले.

महाराष्ट्र बाजारपेठेच्या 'अद्विक एंटरटेनमेंट' अंतर्गत प्रसारित 'स्वामीराया' गीताचे विशेष सादरीकरण करण्यात आले. यावेळी स्वामी समर्थ मठाचे प्रमुख आदरणीय भाई यांची उपस्थिती होती. कु. अद्विक दांडगे आणि भाई यांच्या शंखनादाने सभागृह भक्तिमय झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष लिंबोरे पाटील आणि श्रुती परब यांनी केले. महिलांचा सन्मान, सहभाग आणि कलागुणांना प्रोत्साहन देणारे उपक्रम भविष्यातही सुरू ठेवणार असल्याचे महाराष्ट्र बाजारपेठ परिवाराच्या वतीने सांगण्यात आले.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता,इलाखा शहर विभाग,यांचे कार्यालय**

Email : presidency.ee@mahapwd.com

☎ २२०१६९७५/७७
२२०१६९७३

**ई-निविदा सुचना क्र.३६ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, मुंबई, हे अनुभवी कंत्राटदार / पुरवठादार यांच्याकडून खालील कामाकरीता "ड" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.inयेथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याच्या अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**कामाचे नाव :-** 1) Providing and erecting of waterproof mandap roof upto 15ft high, PVC chair, dunlop sofa, leather sofa, folding table of size 4x2, wash basin, VIP chair, white partition, wooden stage, round table and cnopy for govt bunglow Sevasadan under N.D. road, Mumbai.
(Estimated Cost Rs.11,95,674/-)

**ई-निविदा उपलब्ध कालावधी-** दि. २५.०८.२०२६ ते दि.०२.०९.२०२६

**ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास)** दि.०३.०९.२०२६

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.

१) http://mahapwd.com
२) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र. काअ/इशवि/भांडार/ई-निविदा/** ७९५०
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला,**
**२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१**
**दूरध्वनी क्र. २२०१६९७५/७७**
**दिनांकः-** २९।८।२०२६

(वि.अ.पाटसकर)
**कार्यकारी अभियंता**
**इलाखा शहर विभाग मुंबई**

आरओसी-२०२६-२७/क्र-५/C२४६३

# बोंडारवाडी धरणाला 14 वर्षांनंतरही मुहूर्त मिळेना!

# 54 गावांच्या पाणीप्रश्नासाठी लढा; धरणग्रस्तांचा सध्याच्या धरणरेषेला विरोध

केळघर (अजित जगताप) : जावळी तालुक्यातील महत्त्वाकांक्षी बोंडारवाडी धरण प्रकल्पाला तब्बल १४ वर्षांनंतरही मुहूर्त मिळालेला नाही. ५४ गावांच्या पिण्याच्या पाणी व सिंचनाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी महत्त्वाचा असलेला हा प्रकल्प दीर्घकाळ रखडल्याने धरणग्रस्तांमध्ये नाराजी वाढली असून, आता तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात येत आहे.



बोंडारवाडी धरण कृती समिती व पाणी संघर्ष समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर प्रशासनाने नियोजित धरणरेषेवर माती व खडकांची चाचणी घेण्यासाठी 'ट्रायल पीट'चे काम हाती घेतले आहे. मात्र, सध्याच्या धरणरेषेमुळे बोंडारवाडी, भुतेघर व वाहिटे ही गावे पूर्णतः किंवा अंशतः बाधित होण्याची शक्यता असल्याने ग्रामस्थांनी त्यास विरोध केला आहे. शेतजमीन व घरे सुरक्षित ठेवूनच पुनर्वसनाचा आराखडा तयार करावा, अशी त्यांची मागणी आहे.

सुमारे एक टीएमसी क्षमतेच्या या धरणामुळे केळघर व मेढा परिसरातील ५४ गावांचा पाणीप्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. मात्र, भू-तांत्रिक सर्वेक्षण, वनजमिनीची संयुक्त मोजणी, पर्यायी वनीकरण आराखडा आणि केंद्राची 'स्टेज-१' मंजुरी अशा प्रक्रियांमुळे प्रकल्प रखडला आहे.

२०१२ पासून ग्रामस्थांनी विविध आंदोलने केली. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा, मेढा येथे धरणे आंदोलन तसेच मार्च २०२३ मध्ये कुडाळ ते मेढा भव्य पायी मोर्चा काढण्यात आला. पक्षभेद विसरून अनेक नेते, कार्यकर्ते व ग्रामस्थ या लढ्यात सहभागी झाले आहेत.

### १४ वर्षांचा वनवास संपूनही प्रश्न कायम!

प्रभू श्रीरामचंद्रांचा १४ वर्षांचा वनवास संपला; मात्र सत्तेत सर्वच 'भक्त' असतानाही बोंडारवाडी धरणाचा १४ वर्षांचा वनवास संपत नाही. याला काय म्हणावे? असा मार्मिक सवाल धरणग्रस्तांकडून उपस्थित केला जात आहे.

## सुरेश काळे यांची दक्षिण मध्य मुंबई अध्यक्षपदी नियुक्ती



पुणे : राष्ट्रीय चर्मकार संघ महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने राष्ट्रीय कार्यकारिणीचा महापरिसंवाद, आढावा बैठक व पदनियुक्ती प्रदान सोहळा पुणे येथे उत्साहात पार पडला. संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार बाबुराव माने यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि प्रदेशाध्यक्ष सूर्यकांत गवळी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला.

बैठकीत संघाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करणे, चर्मकार समाजाच्या विविध प्रश्नांवर प्रभावीपणे काम करणे, युवक-युवती व महिलांना संघटित करणे तसेच राज्यभर संघटनेचा विस्तार वाढविण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी समाजहिताची व लोकोपयोगी कामे करणाऱ्या समाजबांधवांचा पदनियुक्ती देऊन गौरव करण्यात आला. मुंबईतील नायगाव, भोईवाडा, शिवडी व वडाळा विभागातील ज्येष्ठ समाजसेवक सुरेश यमुनाई गणपत काळे यांच्या ५० वर्षांच्या सेवाभावी कार्याची दखल घेऊन त्यांची दक्षिण व दक्षिण मध्य मुंबई विभागाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष बाबुराव माने यांच्या हस्ते त्यांना पद प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या नियुक्तीने काळे यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## कराड एस.टी. आगारात नव्या राजमाता जिजाऊ बसेस दाखल; आमदार डॉ. अतुल भोसले यांच्या प्रयत्नांना यश

कराड : कराड एस.टी. आगारात प्रवाशांच्या सेवेसाठी नवीन राजमाता जिजाऊ बसेस दाखल झाल्या असून, त्यांचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कराड व परिसरातील नागरिकांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि सुविधाजनक प्रवास मिळावा, या उद्देशाने या बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



कराड आगारात नवीन बसेस मिळाव्यात, अशी मागणी प्रवासी, नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून सातत्याने करण्यात येत होती. यासाठी एस.टी. महामंडळाकडे निवेदने व अर्जही करण्यात आले होते. या मागणीचा पाठपुरावा करत आमदार डॉ. अतुल भोसले यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून, आगाराला नवीन बसेस मिळाल्या आहेत.

दररोज हजारो प्रवासी कराड आगारातून एस.टी.च्या माध्यमातून प्रवास करतात. त्यामुळे वाढत्या प्रवासी संख्येच्या तुलनेत बससेवा सक्षम करण्याची गरज होती. नवीन बसेस दाखल झाल्याने ग्रामीण तसेच शहरी भागातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

दरम्यान, कराड एस.टी. आगारातील प्रवाशांच्या सुविधांबाबत 'धगधगती मुंबई' वृत्तपत्रानेही सातत्याने पाठपुरावा केला होता. आगारातील तुटलेली बाकडे आणि गर्दुल्यांचा वावर याबाबत वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते. त्याची दखल घेत नवीन बाकडे बसविण्यात आले.

आता नवीन बसेस उपलब्ध झाल्याने प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण असून, आमदार डॉ. अतुल भोसले यांचे नागरिक व प्रवाशांकडून आभार मानण्यात येत आहेत.

## 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन'मध्ये आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची दमदार धाव

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने सेंट्रल पार्क, खारघर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन'मध्ये सहभागी होत २१.२ किलोमीटरचे अंतर २ तास २६ मिनिटे २२ सेकंदांत पूर्ण केले. त्यांच्या या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

डॉ. शिंदे यांनी यापूर्वी दक्षिण आफ्रिकेतील प्रतिष्ठेची कॉम्रेड मॅरेथॉन, टाटा मुंबई मॅरेथॉनसह विविध नामांकित मॅरेथॉनमध्ये यशस्वी सहभाग घेतला आहे. नवी मुंबई महानगरपालिकेचा अत्यंत महत्त्वाचा कारभार सांभाळताना व्यस्त दिनक्रमातूनही त्यांनी धावण्याचा नियमित सराव कायम ठेवला आहे.

दररोज पहाटे उठून धावण्याचा सराव करताना त्यांनी शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक बळ आणि जिद्दही जोपासली आहे. 'ध्येय, मेहनत आणि सातत्य' या त्रिसूत्रीच्या माध्यमातून कोणतेही लक्ष्य साध्य करता येते, याचा आदर्श त्यांनी आपल्या कृतीतून घालून दिला आहे. त्यांच्या या यशस्वी कामगिरीबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




## महाराजा अगरबत्ती कंपनीची पानडी आणि हिना अगरबत्ती बाजारात

मुंबई : अगरबत्तीच्या क्षेत्रात धूम मचवणारी महाराजा अगरबत्ती कंपनी आता सणांचे विशेष महत्व लक्षात घेऊन पानडी आणि हिना प्युअर ब्रँडची अगरबत्ती बाजारात आणली आहे. ह्या अगरबत्तीच्या मनमोहक सुगंधाने देवाची प्रार्थना करताना मन एकदम प्रसन्न राहते. अगरबत्ती बनविण्यासाठी वापरण्यात आलेला उत्तम प्रकारचा परफ्युम व उत्तम दर्जाची काडी यामुळे ही अगरबत्ती बराच वेळ जळत राहते आणि विझल्यानंतर देखील तिचा सुगंध बराच वेळ दरवळत राहतो. या अगरबत्तीला नैसर्गिक सुगंध आहे. दैनंदिन जीवनात पवित्र कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या अगरबत्ती नैसर्गिक वनस्पती पासून तयार केल्या आहेत. वनस्पतीच्या गुणांच्या लाभाबरोबरच आरोग्य आणि मानसिक शांतीदेखील प्राप्त करू शकाल. ही अगरबत्ती ५० ग्रॅम, १०० ग्रॅम आणि २५० ग्रॅमच्या पॅकिंगमध्ये उपलब्ध आहे. अगरबत्ती खरेदी करताना महाराजा अगरबत्ती कंपनीचा लोगो बघूनच खरेदी करा व नकली अगरबत्ती पासून सावध रहा. कारण ही अगरबत्ती बनविण्यात आलेला परफ्युम हा आरोग्यास हानिकारक नाही म्हणून महाराजाचीच अगरबत्ती वापरा. महाराजा अगरबत्ती वर्कस्च्या अगरबत्त्या विविध प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत. तसेच केसरिया ऊद, केसरिया चंदन, प्रार्थना, मिस्टीक मस्क, मिस्टिक रोझ, टेंपल ब्लिस, सुखद सैंडल, पल्सर, बेला, कॉन्फिडंट, ड्रीम, लव्हेंडर, सॅन्डलवुड, ग्रीन मस्क, रॉयल ऊद अनमोल, मिस्टीक रॉयल ऊद, केसरीया ऊद, ड्रीम, लव्हेंडर, काश्मिरी लव्हेंडर, अंगारे ऊद, कॉन्फिडंस आणि कस्तुरी अशा अनेक प्रकारच्या चांगल्या सुगंधी अगरबत्त्या प्रत्येक अगरबत्तीच्या दुकानात तसेच महाराजा अगरबत्ती, रघुनाथ निवास, डि.व्हि. देशपांडे मार्ग, शिवाजी पार्क रोड क्र. ४, दादर पश्चिम मुंबई - ४०००२८ येथे उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी क्र. ८३६९१८५०७१ वर संपर्क करणे.

Printed and published by Bhimrao Hindurao Dhulap, Printed at Plaskot Industries, 23, Municipal Indl. Estate, K. K. Marg, Satrasta, Mumbai -400 011 and published at C/66, Mukuda Nagar, A-Ward, Laxmi Mandir, Dharavi, Mumbai - 400 017. Editor : Bhimrao Hindurao Dhulap, Mob. 9221117684
Any litigation against the content will be entertained under the jurisdiction of Mumbai only.

हे साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक, मालक श्री. भिमराव हिंदुराव धुळप यांनी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीयल इस्टेट, के. के. मार्ग, सातरस्ता, मुंबई -४०० ०११ येथून छापून सी/६६ मुंकुंदनगर, ए/ वॉर्ड, लक्ष्मी मंदिर, धारावी, मुंबई - ४०० ०१७ येथून प्रकाशित केले. संपादक : भिमराव हिंदुराव धुळप. मो. ९२२१११७६८४
(प्रकाशित बातम्या / लेखांशी सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद मुंबई न्यायकक्षेत)